**नियमित दिवाणी दावा क्र. १२/२०१७**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००० ३६–२०१७**

**निशाणी क्र. ९८ वरील आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, वादीने सदर दावा मिळकतीबाबत हक्कठराव आणि वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर कामी मे. न्यायालयाने यापुर्वीच वादमुद्दे निश्चित केले असून त्यामध्ये Non joinder of necessary parties चा मुद्दा काढणेत आला आहे. वस्तुत: दावा दाखल करतेवेळी वादी म्हणून रुपावती रघुनाथ चौघुले हिचे एकटीचे नाव दाव्याचे सरनाम्यात लिहीले होते. याकामी वादी हिचेसमवेत तिचा मुलगा आणि दोन विवाहीत मुली यांना पक्षकार न करता वादी हिला प्रातिनिधीक स्वरुपात वादी केले असलेमुळे त्यांना पक्षकार केले नव्हते. याकामी तसा वादमुद्दा उपस्थित झालेमुळे मयत रघुनाथ शिवराम चौघुले यांचे वारस म्हणून वादीसोबत तिचे मुलांना या दाव्याचे कामी पक्षकार करणे आवश्यक ठरु लागल्यामुळे वादीला हा दावा दुरुस्तीचा अर्ज करणे आवश्यक आले आहे. सदर तीन पक्षकारांना दाव्यामध्ये सामील न करणेमागे वादीचा कोणताही हेतु नाही. सबब, त्यांना याकामी पक्षकार केल्यामुळे दाव्याचे गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नसुन खटल्याचे काम कायद्यातील तरतुदीनुसार चालून सर्वांचे हक्कसंबंध प्रभावीपणे निश्चित होणेस मदत होणार आहे. सबब, वादी हिचेसमवेत अन्य तीन पक्षकारांना सामील करुन दाव्याचे सरनाम्यामध्ये मुळ वादी हिला अ.क्र.१ देवुन पुढील तीनही वादींना अ.क्र.२ ते ४ याप्रमाणे दाव्यातील वादी म्हणून सामील  करणेत यावे अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचे सरतपासाचे शपथपत्र

दाखल केल्यानंतर याकामी वादीने फक्त दावा प्रलंबित ठेवण्यासाठी व वेळ काढुपणा करण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे. सबब, हा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा हक्कठराव व वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दावा मिळकतीमधील वादीच्या व प्रतिवादीच्या हक्काबाबत निराकारण करणे सोईचे होणारे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चा मूळ उद्देश असा की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मूळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थीती अभिलेखावर आणून योग्य न्याय व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्यात बदल होणार नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी अर्जातील दुरुस्ती करणेस हरकत नाही. मात्र वादीने हा अर्ज अत्यंत विलंबाने केला असल्यामुळे त्यासाठी खर्च लादणे गरजेचे ठरते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना रक्कम रु.१,०००/– खर्चापोटी पुढील तारखेस अथवा त्यापुर्वी द्यावेत.

३. खर्चाची रक्कम भरुन वादीने १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी. सदर आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.11.08 16:44:50 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः ०६/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड